**दिनांकः** 14 एप्रिल,2014

# निवडणुक प्रचार अभियान डायरी-14.04.2014

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

कॉंग्रेसची निराशा दिवसेंदिवस वाढत चालली आहे. दोन राष्ट्रीय वर्तमानपत्रात बातमी छापून आली आहे की कॉंग्रेसच्या आत काय काय होत आहे. पहिल्या बातमीत सांगितले गेले आहे की, निराशा इतकी अधिक आहे की, मोदी यांना रोखण्यासाठी, प्रियांका गांधी या नरेंद्र मोदी यांच्या विरोधात वाराणसीतून निवडणुक लढण्यासाठी तयार झाल्या होत्या. एका दुस-या वर्तमानपत्रात बातमी छापून आली आहे की, कॉंग्रेसच्या मुख्यमंत्र्यांना सांगण्यात आले की, जर तुम्ही जागा जिंकल्या नाहीत तर तुम्हाला हटविले जाईल.

जर दोन्ही बातम्या ख-या आहेत तर यात या गोष्टीची पुष्टी होते की कॉंग्रेस वास्तविकतेपासून किती दूर आहे. गांधींना घेरले जात आहे. स्थिती अगदी तशीच आहे ज्या स्थितीचा सामना 1977 मध्ये सामान्य निवडणुकांमध्ये इंदिरा गांधी आणि संजय गांधी यांना करावा लागला होता. आर्थिक लोकप्रियता काम करु शकली नाही. परिवाराचा करिश्मा संपला. मात्र असा पक्ष जो एका परिवाराच्या आसपासच फिरतो, त्याला आभास झाला आहे की, परिवाराचा वर्तमान नेता परिणामकारक नाही आहे. या समस्येचे वास्तविक समाधान कॉंग्रेसला अधिक संघटित पक्ष बनविणे आहे. कॉंग्रेस पक्षाचे समाधान असे आहे की, परिवाराचा एक पदस्थ सदस्य जर अयशस्वी ठरला तर त्याचा पर्याय परिवारातला कोणता अन्य सदस्यच असू शकेल. आपल्या पहिल्या लेखात मी याचे अनुमान व्यक्त केले आहे. माझी एकच इच्छा आहे की, निराशेमध्ये वाराणसीसाठी जे समाधान शोधले गेले होते ते वास्तवात अंमलात आणले गेले पाहिजे. परिवाराच्या अन्य सदस्यांबद्दल जे काही कल्पीत आहे ते सुद्धा बाहेर यायला पाहिजे.

समस्या कॉंग्रेसच्या मुख्यमंत्र्यांसोबत नाही आहे. जर कॉंग्रेस पराजित होईल, तर ते त्यांच्या मुख्यमंत्र्यांमुळे नाही होईल. याचे कारण त्यांनी ज्याप्रकारे सरकार चालवली त्याची गुणवत्ता आणि राहूल गांधी यांचे बिनप्रेरणादायक व्यक्तितत्व आहे. जेव्हा समस्या परिवाराच्या आत आहे तेव्हा कॉंग्रेस बाहेर बळीच्या बक-याला का शोधत आहे?

कॅप्टन साहेब यांच्याकडे राजकीय भाषणांचा स्तर खालावण्याची अद्भुत क्षमता आहे. मुद्द्यांवर आधारित असलेल्या सभ्य निवडणुकांमध्ये ते म्हणजे पाण्याअभावी मासा आहेत. माझा, माझ्या सर्व मित्रांना, समर्थकांना आणि अमृतसरमधील शुभचिंतकांना सल्ला आहे की ही निवडणुक आपल्याला शिष्टाईने आणि प्रतिष्ठेला साजेशी अशी लढणे गरजेचे आहे आणि याला मुद्द्यांवर आधारित ठेवले गेले पाहिजे. अमृतसरमध्ये पाहण्यात आले आहे की, लोकांची इच्छा आहे की, नरेंद्र मोदी देशाचे पुढील पंतप्रधान बनावेत. माझ्याकडे उठविण्यात आलेल्या मुद्द्यांप्रती लोकांचा सकारात्मक दृष्टीकोन मी पाहू शकतो. आपल्याला या अजेंड्यापासून हटले नाही पाहिजे.

कॅप्टन यांनी मला बाहेरची व्यक्ती संबोधिले. त्यांच्या विपरित, माझ्या नसा-नसांत शंभर टक्के माझा रक्त वाहतो. मी वचन दिले होते की माझ्या वाड-वडिलांचे शहर होण्याच्या नात्याने, माझे इथे वास्तव्य राहिल. मी हे वचन अंमलात आणले. कॅप्टन यांचे स्वतःचे असे काय आहे? काय अमृतसरमधील जनतेला त्यांना भेटण्यासाठी पटियाला पॅलेसच्या बाहेर अनेक दिवस चकरा माराव्या लागतील?